ॐ

# ज्ञान प्रबोधिनी

## राष्ट्रीय एकात्मता कार्यदिशा

# उपेक्षित समाज गटातील कामांचे वृत्त

## (पुणे, निगडी, सोलापूर, हराळी, आंबेजोगाई)

## वार्षिक वृत्त शके १९४५ / इ. स. २०२३-२४

निर्भयता बळ आस्था यांचे एकी हे दैवत समजावे |
जे जे वंचित त्यांच्यासाठी संघटना हे सूत्र बनावे ||

# अनुक्रमणिका


| अनु.क्र. | विभाग | पान क्र. |
|---|---|---|
| | **शहरी भाग - नागरी वस्ती** | |
| १ | महिला व युवती गट | ०४ |
| | विडी कामगार महिला प्राणायाम वर्ग, सोलापूर | ०५ |
| २ | युवक गट | ०७ |
| | झेंडू फुले विक्री | ०८ |
| ३ | बालगट, किशोरगट, कुमारगट सर्वांगीण विकास | ०९ |
| | बाल विकास प्रकल्प | |
| | विद्याव्रत | १० |
| | अनुभव शाळा प्रकल्प | |
| | पुरवणी अभ्यास वर्ग | १२ |
| | प्रज्ञा विकास कार्यक्रम | १३ |
| | सेवा शिबीर, गुरुकुल: निगडी | १६ |
| | अंकुर प्रकल्प: सोलापूर | १६ |
| | **ग्रामीण भाग - वाड्या, वस्त्या, तांडे** | |
| ४ | नागरी वस्ती आंबेजोगाई | १८ |
| ५ | ऊसतोडी कामगारांच्या तांड्यांवरील आनंदशाळा - हराळी | २२ |
| ६ | कातकरी विकास प्रकल्प - भोर, वेल्हा | २३ |
| ७ | कातकरी वाडीत आनंदी शाळा - सुधागड, रायगड | २७ |
| ८ | विकास मित्र प्रकल्प - पडसरे, रायगड | २९ |
| ९ | पाणी टंचाई निवारण कार्यक्रम | ३० |

# उपेक्षित गटाच्या उपक्रमांचा संक्षिप्त आढावा तक्ता

| क्र. | उपक्रमाचे नाव | कार्यक्षेत्र | वयोगट (मुले -मुली) | सहभागी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | सावित्री दल (महिला गट) | पुणे | महिला | २४६ |
| २. | विडी कामगार प्राणायाम वर्ग | सोलापूर | महिला | ३०० |
| ३. | सामूहिक व्यायाम, अभ्यास यज्ञ | पुणे, सहकारनगर | किशोर, कुमार | ७५ |
| ४. | झेंडू फुले विक्री | पुणे, सहकारनगर | किशोर, कुमार | २५ |
| ५. | साप्ताहिक दले | वडारवाडी | किशोर, कुमार | ७० |
| ६. | आनंदी शिक्षण | अप्पर इंदिरा नगर | बाल, किशोर | १६० |
| ७. | बाल विकास प्रकल्प | मुकुंदनगर | किशोर, कुमार | ४५८ |
| ८. | विद्याव्रत, पूर्वतयारी व संस्कार | पुणे – बिबवेवाडी, मित्रमंडळ चौक | कुमार | १५५ |
| ९. | अनुभव शाळा | पुणे - केशवनगर हडपसर, कोंढवा | किशोर | १८१ |
| १०. | पुरवणी अभ्यास वर्ग | पुणे - दांडेकर पूल | किशोर, कुमार | २२ |
| ११. | प्रज्ञा विकास प्रकल्प | केशवनगर,रामनगर हडपसर, जनता वसाहत, दत्तवाडी, | कुमार | २२० |
| १२. | सेवा शिबिर | पुणे - पद्मावती, जनता वसाहत | किशोर, कुमार | १२० |
| १३. | अंकुर प्रकल्प | सोलापूर | बाल, किशोर | २५ |
| १४. | नागरी वस्ती-भटके विमुक्त | आंबेजोगाई | बाल, किशोर | २०० |
| १५. | तांड्यावरील आनंद शाळा | हराळी(१५ वस्त्या) | बाल, किशोर | ५५० |
| १६. | कातकरी विकास प्रकल्प | वेल्हे (१५ वस्त्या) | कुमार, महिला | १३० |
| १७. | आनंदी शिक्षण | रायगड, सांगली, हराळी, कर्णबधिर | किशोर, कुमार | १०४० |
| १८. | विकास मित्र प्रकल्प | रायगड - पडसरे | कुमार | ३०० |
| १९. | पाणी टंचाई निवारण | पुणे, नाशिक, सोलापूर, सातारा | सर्व वयोगट | १४७०० |
| **एकूण सहभागी सदस्य** | | | | **१८९७७** |
| **एकूण सहभागी कार्यकर्ते** | | | | **२२८** |

# शहरी भाग
# नागरी वस्ती उपक्रम

**पुणे**

१. निगडी
२. हडपसर
३. जनता वसाहत
४. बिबवेवाडी
५. केशवनगर




**सोलापूर**

१. जवाहरनगर
२. अशोक चौक
३. घोंगडे वस्ती
४. सुनीलनगर

## महिला व युवती गट

# १. पुणे

नागरी वस्ती अभ्यास गटातील महिलांच्या कामाची सुरुवात ७ वर्षांपूर्वी झाली. 'सावित्री दल' या नावाने हे काम केले जाते. विभागातील युवतींच्या महिला पालकांच्या पुढाकाराने सावित्री दलाची कामे सुरू झाली. विविध वस्त्यांमधील निवडक महिलांची दरमहा बैठक व वर्षगभरात दोन मोठे कार्यक्रम योजले जाऊ लागले. या वर्षभरात अनेक उपक्रम महिलांचे झाले.

### लोकसंपर्क आणि लोकसंवाद:-

वस्ती भागातील कौटुंबिक जीवन, सामाजिक, राजकीय, धार्मिक व आर्थिक घटकांमधील वातावरण याचा सर्वांगीण अभ्यास लोकांशी संवाद साधून केला जात आहे.

### स्थानिक कार्यकर्ते तयार करणे:-

स्थानिक गरजांवर स्वयंप्रेरणेने विधायक विचार व कामे करणारे कार्यकर्ते तयार व्हावेत या दृष्टीने विभाग प्रयत्न करत आहे. कुटुंबातील सर्व वयातील घटकांसोबत काम सुरू आहे.

**२०२३ मधील कार्यक्रम**

| क्र. | निमित्त | कार्यक्रम | सहभागी गट | उपस्थिती |
|---|---|---|---|---|
| १. | रामनवमी | भजन | ज्ञानगंगा भजन मंडळ व सावित्री दल | ६० |
| २. | आषाढी एकादशी | भजन | सावित्री दल | ५० |
| ३. | मातृभूमि पूजन | अभंग | सावित्री दल | १८ |
| ४. | नवरात्रोत्सव | हिमोग्लोबिन चाचणी,श्री शारदेची उपासना व श्रीसूक्त पठण | सावित्री दल | ११८ |
| | | **एकूण** | | **२४६** |

- **आधुनिक नवरात्र : माझी गोष्ट : काल - आज - उद्या :-**




३ जानेवारी सावित्रीबाई फुले जयंती ते १२ जानेवारी हा राजमाता जिजाऊंचा यांचा जन्मदिन. हे ९ दिवस आधुनिक नवरात्र म्हणून साजरे करावेत ही संकल्पना. **या वर्षी आधुनिक नवरात्राचे आय़ोजन करण्यात आले होते.**

२०२४ या वर्षीची संकल्पना: आधी मी कशी होते, ज्ञान प्रबोधिनीच्या सहवासात आल्यावर माझ्यामध्ये काय बदल झाले आणि भविष्याबद्दल माझी काय स्वप्ने आहेत याबद्दल मांडणी केली.



## २. सोलापूर

### विडी कामगार महिलांसाठी प्राणायाम वर्ग

विडी कामगार महिलांची आरोग्य सधारणा, त्यांचे संघटन व यांच्यात समूहगुण विकसित व्हावेत यासाठी आपण प्राणायाम वर्गाची सुरुवात केली. गेल्या वर्षभरात या महिलांचा आत्मविश्वास व त्यांची प्रबोधिनीशी जवळीक वाढवण्यासाठी काही उपक्रम घेतले गेले.



**प्राणायाम वर्ग -**

विडी कामगार महिलांची आरोग्य सुधारणा, त्यांचे संघटन व त्यांच्यात समूहगुण विकसित व्हावेत यासाठी आपण प्राणायाम वर्गाची सुरुवात केली.

**आषाढी एकादशी भजन उपासना -**

चार प्रभागांमधून सुमारे ३० महिलांनी व्यासपीठावरून अभंग सांगितले व ७०० नगरवासीयांनी भजनसंध्येचा भक्तिरस अनुभवला.

**साक्षरता वर्ग -**

प्राणायाम वर्गातील ज्यांना लिहिता-वाचता येत नाही, त्यांच्यासाठी साक्षरता वर्ग चालू करण्यात आले. चार प्रभागात मिळून एकूण ३० जणांनी प्रौढ साक्षरता वर्गात सहभाग नोंदवला. आतापर्यंत ५ जणी जोडशब्द वाचायला शिकल्या आहेत.

**आरोग्य तपासणी -**

प्राणायाम वर्गातील चार प्रभागांमधील एकूण ३३३ महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. यामध्ये महिलांचे वजन, उंची, बीपी, एचबी तपासणी केली गेली.

**रक्तदान -**

महिलांच्या सामाजिक विकसनासाठी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ३३ सदस्यांनी रक्तदान केले. प्राणायाम वर्गातील १४ महिलांनी आयुष्यात प्रथमच रक्तदान केले.

## शासकीय योजना कार्यशाळा -

शासकीय योजनांची माहिती देणारी दोन तासांची कार्यशाळा संपन्न झाली. महिलांना स्किल डेव्हलपमेंट, ई श्रम कार्ड, विधी प्राधिकरण इ. योजनांसंदर्भात माहिती दिली. तसेच पर्यटन क्षेत्रातील उद्योगाच्या संधी महिलांना नव्याने कळाल्या.

## रंगले उखाणे -

मकरसंक्रांतीनिमित्त प्राणायाम वर्गातील चार प्रभागांमधील २६९ महिलांचा तिळगूळ मेळावा संपन्न झाला. महिलांना कार्याची प्रेरणा देणारे मार्गदर्शन झाले. गंमतीचे खेळ, गरबा यासोबतच आग्रहाच्या उत्स्फूर्त उखाण्यांनी कार्यक्रम रंगला.

## शिक्षण -

'सोलापूर जिल्हा योग संजीवनी' ची प्रथम परीक्षा २२ महिलांनी तर द्वितीय परीक्षा १३ महिलांनी दिली. इ.७वी ते १०वी पर्यंतच्या शिक्षण झालेल्या या महिलांची पुन्हा १५-२० वर्षांनंतर परीक्षेला बसून शिकण्याची जिद्द वाखाणण्याजोगी होती. या ३५ पैकी ३२ महिला उत्तीर्ण झाल्या.

## आरोग्य शिबिर -

प्राणायाम वर्गातर्फे चार प्रभागांमध्ये मोफत आरोग्य शिबिर संपन्न झाले. एकूण ७०८ सदस्यांनी याचा लाभ घेतला. एकूण १० डॉक्टरांनी मेळाव्यातील रुग्णांना तपासून औषधोपचार केले.




## प्रतिज्ञाग्रहण -

प्राणायाम वर्गाच्या सर्व प्रभागांतील एकूण ३४२ महिलांचा एकत्रित मेळावा झाला. गेल्या वर्षभरात झालेल्या विविध वैचारिक उपक्रमांमधून प्रेरणा मिळालेल्या ९ महिलांनी तेलुगुमधून व ३ महिलांनी मराठीतून देशसेवेची प्रथम प्रतिज्ञा घेतली. प्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीश श्री. बापट यांनी स्वविकास ते समाजविकासासाठीच्या संकल्पांपर्यंत नेण्याच्या पायऱ्या मांडल्या आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा दिली.

**सहभागी गट व संख्या:-**

३० गटांमधून ३०० (बहुतांश) विडी कामगार महिला, ३० प्राणायाम वर्ग गटप्रमुख व ६ प्रभागप्रमुख

**स्थळ:-** सोलापूर शहरातील

विडी घरकुल, जवाहरनगर, अशोक चौक, लोधी गल्ली, घोंगडे वस्ती, सुनीलनगर, सोलापूर.

## युवक गट

### १. पुणे

महापुरुषांच्या स्मरणदिनांच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा ठेवा आपण सर्व जण आठवत असतो. गेल्या महिन्यात सहकारनगर भागातील वस्ती भागात चालणाऱ्या प्रबोधिनीच्या विविध दलांनी अशाच प्रकारचे उपक्रम विविध दलांवर केले. त्याचे संकलन पुढीलप्रमाणे –

### रामनवमी निमित्त सामूहिक व्यायाम

प्रभू श्री रामचंद्र हे संघटनेचे व सामूहिक पराक्रमाचे प्रतीक आहेत. ६० युवकांनी मिळून १२,१०० जोर मारून श्री रामनवमी साजरी केली!

इतर वेळी DJ वर नाचून रामनवमी साजरी करणाऱ्या मुलांनी व युवकांनी या वेळी सामूहिक जोर मारत रामनवमी साजरी केली.



### भारतरत्न डॉ. आंबेडकर जयंती निमित्त अभ्यास यज्ञ



डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरनेतून लोकमान्य टिळक युवक दलातील २४ युवकांनी एकत्र येऊन सकाळी ६ ते रात्री १२ असा सलग १८ तास डॉ. बाबासाहेबांच्या चरित्राचा अभ्यास केला!

**बाहेर अनेकदा 'अमुक महापुरुष, त्यांचे विचार आपले, इतर विचार परके' असे होताना आपण पाहात असतो. या सर्वांचेच विचार, कार्य ही आपलीच परंपरा आहे हे समजणे, हीच ज्ञान प्रबोधिनीत सेतुबंधनाची सुरुवात आहे.**

## झेंडू फुले विक्री

वस्ती भागातील मुलांच्या उद्योजकता विकासासाठी युवक विभागामध्ये आकाश कंदील विक्री, गणेश मूर्ती विक्री, पणती विक्री, असे विविध उद्योजकता उपक्रम राबवले जातात. यावर्षी या उपक्रमांत छत्रपती शिवाजी दलाने दसऱ्या च्या निमित्ताने फुले विक्री या उपक्रमाची भर घातली. लवकर खराब होणाऱ्या वस्तू ची विक्री कशी करावी व त्या एका दिवसाचे Pressure कसे हाताळावे हे मुले शिकली.




यासोबतच छोटे उद्योग कसे चालतात, त्यातील आर्थिक व सामाजिक अडचणी काय असतात हे मुलांना कळल्याचे दिसून आले. एका दिवसात ४०० किलो फुले विकून व ४००० रुपयांचा नफा कमावून फुले विक्री चा नवीन प्रयोग यशस्वी रित्या पार पाडला.

**निर्भयता बळ आस्था यांचे एकी हे दैवत समजावे ।**

**जे जे वंचित त्यांच्यासाठी संघटना हे सूत्र बनावे ।।ध्रु.।।**

**दुरावती जन तुटकपणाने जो तो वेची अपुले नाणे**

**रानदांडग्या शर्यतीमध्ये चिरडुन गेले चिमणे गाणे**

**एकाकी जन दुर्लक्षित जन आप्त एकमेकांचे व्हावे**

**केवळ आभाळीच्या देवा भिउनी कोणी किती भजावे ।। ३ ।।**

**आजवरी जे भिउन राहिले पूर्ण अडाणी दुबळे झाले**

**परस्परांचे पाय ओढुनी होते तेथुनी मागे आले**

**एक जयांचे दुखणे त्यांनी समदुःखी बंधू समजावे**

**आणि एकता हेच आपुले याच्यापुढती दैवत व्हावे ।। ४ ।।**

## बाल - किशोर - कुमारगट

### १. पुणे

वस्त्यांमध्ये व ज्ञान प्रबोधिनीच्या पुणे वास्तूमध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मुलामुलींसाठी वर्षभर विविध कार्यक्रम घेतले जातात. या वर्षी साप्ताहिक दले, शैक्षणिक प्रकल्प, व्यक्तिमत्व विकास तासिका इ. उपक्रम राबवण्यात आले.

#### १. साप्ताहिक दले:-

वडारवाडी, जोशीवाडा, सातचाळ या ठिकाणी साप्ताहिक दले झाली. दलामध्ये एकूण ७० मुले-मुली सहभागी झाले. दलामध्ये विविध खेळ, गाणी-गोष्टी व अभ्यासपूरक सत्रे घेतली गेली.





#### २. आनंदी शिक्षण

शहरी वस्त्यांमधील इयत्ता ३री व ४थी च्या मुलांसाठी भाषा व गणित या विषयांसाठी अभ्यासक्रम तयार करून मुलांना खेळाच्या व व्हिडिओच्या माध्यमातून शिकवले गेले.

#### ३. बाल विकास प्रकल्प

वस्त्यांमधील स्थानिक ताईची निवड करून त्यांचे प्रशिक्षण घेऊन १६ वस्त्यांमध्ये बाल विकास केंद्र सुरु करण्यात आले. १६ वस्त्यांमधील एकूण ३५० नाव नोंदणी या प्रकल्पासाठी झाली.

**अभ्यास कौशल्य सत्र :**

अक्षरबोध, विरामचिन्हांचे वाचन या कौशल्यांचा सराव सत्रात घेतला गेला. तसेच शब्दभांडार आणि शब्दांचे श्रुतलेखन या विषयांशी संबंधित अभ्यास कौशल्ये शिकवली. या उपक्रमास एकूण ४१ मुलांची उपस्थिती होती.

- **प्रशिक्षक प्रशिक्षणे -**

**१) व्यक्तिमत्त्व विकास सत्रे**
**२) विविध क्षमता विकसन कृतिसत्रे**
**३) कला प्रशिक्षण**

- **बालजत्रा: शैक्षणिक मार्गदर्शन व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन**

यामध्ये इयत्ता ५ वी ते ८ वी या वयोगटातील एकूण १०८ विद्यार्थी सहभागी झाले होते. उपक्रमात विद्यार्थ्यांचे भाषा व गणित या विषयांचे हसतखेळत प्रश्नोत्तरांनी मूल्यमापन केले गेले. बरोबर उत्तरांसाठी मुलांना बक्षिसे आणि पौष्टिक खाऊ दिला. सहभागी मुलांचा उत्साह, आनंद आणि उत्सुकता शेवटपर्यंत दिसून आली. खाऊ व खेळण्यांनी जत्रेला आकर्षक रूप आले.

## ४. विद्याव्रत

व्यक्तिमत्व विकसनासाठी विद्याव्रत या संकल्पनेवर आधारित, **"चांगल्या सवयी, चांगला माणूस"** हा उपक्रम २ शाळांमध्ये सुरू आहे. ज्ञान प्रबोधिनीतील विद्याव्रत संस्कार, ही संकल्पना पंचकोषावर आधारित आहे. स्वतःला ओळखून आपल्यातील चांगली कौशल्ये विकसित करायची व नको असलेल्या सवयी कमी करायच्या आणि हळू हळू वाईट सवयी पूर्ण गेल्या पाहिजेत आणि आपल्या भावना या संयमित राहिल्या पाहिजेत त्यासाठी संकल्प करायचे. आजची पिढी ही निरोगी आणि निर्व्यसनी रहण्याबरोबरच चारित्र्यवान असली पाहिजे. त्यांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून आपण अनेक शाळांत, वस्तीतील मुलांसाठी या विद्याव्रताच्या तासिका, शिबिरे, मेळावे आणि संस्कार योजनापूर्वक घेतो.

### ● विश्वकर्मा विद्यालय, बिबवेवाडी: विद्याव्रत पूर्वतयारी शिबिर

यावर्षी ७ वी च्या दोन वर्गातील १२३ विद्यार्थ्यांसाठी एकूण ३ मेळावे व ५ दिवसांचे शिबिर झाले. युक्ताहार विहार, इंद्रिय संयमन, दैनंदिन उपासना, स्वाध्याय प्रवचन, सद्गुरू सेवा, राष्ट्रअर्चना ही ६ व्रते विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली.



**१२३ विद्यार्थ्यांचा विद्याव्रत संस्कार कार्यक्रम.**

### ● सुंदराबाई राठी विद्यालय, मित्रमंडळ चौक: विद्याव्रत तासिका

यावर्षी सुंदराबाई राठी शाळेत इयत्ता ७ वीच्या एकूण ३२ विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रत तासिका सुरू करण्यात आल्या. व्याख्यान – गटचर्चा, विविध खेळ, प्रार्थना, पद्य, यामार्फत मुलांपर्यंत व्यक्तिमत्व विकासाचे विविध विषय पोहोचवण्याचे कार्य सुरु झाले.

## ५. अनुभव शाळा

पुणे शहरातील हडपसर भागात नागरी वस्तीत राहणाऱ्या वय वर्ष ६ ते ११ वयोगटातील मुला/मुलींसाठी ‘अनुभव शाळा’ प्रकल्प गेली १२ वर्षे चालू आहे. विद्यार्थी/विद्यार्थिनींमध्ये शाळेच्या वेळे व्यतिरिक्त मुलभूत क्षमता विकसन, कृतीयुक्त अनुभव शिक्षण, व संस्कार मूल्य शिकविण्यासाठी तसेच त्यांच्यात शिक्षणाची आवड निर्माण व्हावी, व शालेय अभ्यासात गती वाढावी. यासाठी अनुभव शाळेत विविध उपक्रम घेतले जातात. या माध्यमातून सगळया विद्यार्थी/विद्यार्थिनींना त्यांच्या मध्ये अवगत असलेले कलागुण दाखवण्याची संधी मिळते.

### केंद्र निहाय विद्यार्थी सरासरी उपस्थिती तक्ता

| अ.क्र | केंद्राचे नाव | पट | सरासरी उपस्थिती |
|---|---|---|---|
| १. | कम्युनिटी सेंटर - केशवनगर | ४२ | ३५ |
| २. | गायरान वस्ती - केशवनगर | ४६ | ३२ |
| ३. | महात्मा फुले वसाहत - हडपसर | ३३ | ३० |
| ४. | जय भवानी नगर - कोथरूड | ३० | ३० |
| ५. | काकडे वस्ती - कोंढवा | ३० | २८ |
| **एकूण** | | **१८१** | **१५५** |

## अभ्यासक्रम:



वयानुसार मुलांचे दोन गट करून ११ विषयांवर एकूण प्रत्येकी २२७ तासिका वर्षभरात घेतल्या गेल्या. विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संस्कार घडावेत प्रार्थना, भजन, संस्कारक्षम गीते व श्लोक नियमित घेतले गेले. मूल्य संस्कारासोबतच मुलांना आधुनिक जगातील ज्ञान प्राप्त व्हावे, म्हणून संगणक व टॅब कसा वापरावा याचे प्रशिक्षण मुलांना देण्यात आले.

## कला व कौशल्ये:

विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलता निर्माण व्हावी. त्यांच्या कला व कौशल्ये ज्ञानात भर पडावी या दृष्टीने काही कला/कार्यानुभवाची तासिका घेण्यात आल्या. चित्रकला, शिल्पकला, क्राफ्ट बनवणे इ. कला मुलांना शिकवण्यात आल्या.



**शिल्पकला** - गणेश चतुर्थीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी मातीपासून गणपती, नाग, महादेवाची पिंड, विद्यार्थ्यांना नवीन कृती करता यावी या उद्देशाने नारळाच्या करवंटी पासून तबला, घर बनविण्यास शिकवले.

**विशेष उपक्रम –**

यावर्षी आषाढी एकादशीनिमित्त वारी व अभंग पठण, ज्ञानज्योती सावित्रीबाई जयंती निमित्त क्रांतिकारकांचा पोशाख मुलांनी घातला. तसेच, संविधान दिवसही वर्गात साजरी केला गेला.

**अनुभव शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये झालेले बदल –**

नियमित वर्गाला विद्यार्थी स्वच्छ येतात. मनाचे श्लोक, पसायदान, गणपती स्तोत्र, आई माझा गुरु, शुभं करोती तसेच त्या त्या इयत्तेनुसार पाढे पाठांतर झाले आहेत. शाळेतील वार्षिक परीक्षेत विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. भाषा व गणित विषयातील मूलभूत क्षमता त्या त्या इयत्तेतील विद्यार्थ्यांच्या विकसित झाल्या आहेत.

## ६. पुरवणी अभ्यास वर्ग

प्रबोधिनीतील एकूण ४५ मुला-मुलींनी दांडेकर पूल वसाहती मधील विद्यार्थ्यांची अभ्यासिका व खेळ घेतले. यामध्ये शालेय पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रम शिकवणी व त्यासोबतच विविध विषयांवर आधारित कृती कार्यक्रम घेतले. विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये शिकवण्यात आली.



**अभ्यास कौशल्य :-**

यामध्ये विविध अभ्यास कौशल्ये शिकवण्यात आली. यामध्ये नियमित वाचन सराव, वाचन वेग, आणि आकलनयुक्त वाचनाचा सराव करण्यात आला.

**विशेष दिनाचे आयोजन :-**

गुरुपौर्णिमा, स्वातंत्र दिन, विज्ञान दिन, संविधान दिन, प्रजासत्ताक दिन, मराठी भाषा दिन इ. तसेच महापुरुषांच्या जयंती कार्यक्रमांचे आयोजन केले. त्यामध्ये विशेष दिनाचे महत्त्व समजून घेतले, आणि महापुरुषांची कामे समजून घेण्याचा प्रयत्न केला.

**विशेष :-**

या वर्षात दोन शालाबाह्य विद्यार्थिनी आपल्या अभ्यासिकेत नियमित येतात वय वर्ष 11 आणि 13 असूनही आजपर्यंत कोणत्याही शाळेत प्रवेश घेतलेला नाही. परंतु आपल्या प्रकल्पात या मुली नियमित सहभागी झाल्या. ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्रातील तायांनी दोन महिन्यांसाठी आठवड्यातून एकदा स्वयंसेवक म्हणून काम केले.

## ७. प्रज्ञा विकास कार्यक्रम

'प्रज्ञा विकास कार्यक्रम' हा पुणे शहरातील नागरी वस्ती भागात राहणाऱ्या बुद्धिमान/प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व विविध कौशल्यावर आधारित उपक्रम राबविणे या हेतूने भारत फोर्ज कंपनीच्या अर्थसहाय्यातून २०१४-१५ साली सुरू करण्यात आला.

या वर्षात अभ्यास कौशल्य उत्तम प्रकारे शिकवली गेली त्यामुळे शालेय अभ्यासक्रमात विद्यार्थीची प्रगती दिसून आली. उन्हाळी शिबिरात १०० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले.

### विद्यार्थी निवड प्रक्रिया –

मुख्यतः सामान्य ज्ञान, मराठी, गणित, बुद्धिमत्ता चाचणी या विषयावर भर दिला. एकूण ५० गुणांची परीक्षा घेतली. प्रथम संस्था ने दिलेल्या यादीतील एकूण १७८ विद्यार्थी पैकी ७९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

### शिक्षक प्रशिक्षण –

प्रत्येक गुरुवारी दोन तासाचे शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले. यामध्ये तासिका नियोजन,कार्यपत्रक,पालक बैठक, विद्यार्थी संपर्क यावर चर्चा झाली. शिक्षकांनी तासिका कशी घ्यावी ह्याचे मार्गदर्शन प्रकल्प प्रमुख करतात. शिक्षकांना तासिका घेताना,वस्तीमध्ये गृहभेटी घेताना येणाऱ्या समस्यां व त्यावरील उपाय याबाबत देखील चर्चा केली जाते.

### तासिका रचना –

तासिकेची सुरवात पद्य, प्रार्थना, मनाचे श्लोक याने केली जाते. नियोजित अभ्यासक्रम शिकवल्यानंतर त्यावर आधारित कार्यपत्रिका सोडवण्यास देण्यात येते. नियोजित घटकाला अनुसरून गृहपाठ दिला जातो. मोकळया वेळात मैदानी व बैठे खेळ घेतले जातात. रविवारच्या सत्राची सुरवात योगा व सूर्यनमस्काराने केली जाते.

### अभ्यासक्रम –

| अनु.क्र. | मुख्य घटक | तासिका |
|---|---|---|
| १ | अभ्यास कौशल्य | ३० |
| २ | बुद्धिमत्ता संवर्धन | ०८ |
| ३ | व्यक्तिमत्व विकसन | ०७ |
| ४ | विज्ञान विकास | ०८ |
| ५ | जीवन कौशल्य | १४ |
| ६ | विशेष उपक्रम | २३ |
| एकूण | | ९० |

## उपयोजनात्मक अनुभव :-

### 1. क्षेत्र भेट :-

| वस्ती | क्षेत्रभेट | अनुभव |
|---|---|---|
| केशवनगर व दत्तवाडी | पोलिस चौकी | कामकाज व वस्तीतील त्यांचे महत्त्व |
| जनता वसाहत | लाल महाल व केसरी वाडा | टिळकांचा जीवनप्रवास |
| रामनगर | ऐतिहासिक वस्तू प्रदर्शन | मध्ययुगीन व शिवकालीन वस्तू |
| महात्मा फुले वस्ती | तुकाई टेकडी | पठार रचना समजून घेणे |



**रामनगर केंद्र** –
जुणे नाणी व नोटांच्या प्रदर्शनास भेट

### 2. व्यायाम सूर्यनमस्कार खेळ:

प्रत्येक रविवारी सत्राच्या सुरुवातीला २५ मिनिट सूर्यनमस्कार, योगासने, प्राणायाम, 3 वेळा ओंकार उच्चार घेतली जाते.



### 3. राखी निर्मिती:-



प्रत्येक विद्यार्थ्यांनी स्व कल्पनेने ३ ते ४ प्रकारच्या राख्या तयार केल्या. तसेच बनवलेल्या राख्यांची विक्री का व कशी करायची? राखी विक्री करण्यासाठी काय काय कराल? किंमत कशी ठरवणार? ग्राहक कसे मिळवाल? ग्राहकांसोबत संवाद इ. गोष्टीवर चर्चा झाली.

## वर्ग निहाय विद्यार्थी संख्या

| अनु क्र. | केंद्राचे नाव | मुली | मुले |
|---|---|---|---|
| १. | कम्युनिटीसेंटर,केशवनगर | २२ | ३२ |
| २. | महात्मा फुले वसाहत, हडपसर | २३ | २२ |
| ३. | जनता वसाहत, पर्वती पायथा | १८ | ३० |
| ४. | दत्तवाडी | २० | २० |
| ५. | रामनगर | १६ | १७ |
| **एकूण** | | **९९** | **१२१** |

## विद्यार्थी समाजगट तक्ता

| अनु.क्र. | केंद्राचे नाव | समाज गट | पालकांच्या कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | कम्युनिटी सेंटर, केशवनगर, मुंढवा | कोळी,पारधी,माळी,मराठा, लिंगायत,मुस्लीम | खाजगी नोकरी,इलेक्ट्रिशियन, वाहनचालक,घरकाम |
| २. | महात्माफुले वसाहत,हडपसर | भटक्या जमाती,मातंग, मांग,वडार,सोनार, मुस्लिम,शीखकली व टाक | दुकानदार,सुरक्षारक्षक,आचारी, मजरी,शिंपी,नर्स,लिफ्ट ऑपरेटर, रिक्षा चालक |
| ३. | जनता वासहत, पर्वती | मराठा,मातंग,मांग,नवबौद्ध, तिलोरी कुणबी,सुतार | हमाली,खाजगी नोकरी,केटरिंग, बांधकाम,वाहनचालक,घरकाम, शिवणकाम इ. |
| ४. | गुरुदत्तवसाहत, दत्तवाडी | मराठा,नवबौद्ध,बौद्ध,चांभार, मांग, कुणबी, अन्य राज्यातील समाज | बिगारी,वाहनचालक,मजुरी,गवंडी, हमाली,रंगकाम,गिरणी,दुकानदार, सफाईकामगार,आया,घरकाम, शिवणकाम इ. |
| ५. | रामनगर,वारजे माळवाडी | महार,मांग,गोसावी,वैदू,मातंग, कुणबी,मुस्लिम,सुतार,मराठा. अन्य राज्यातील समाज | रिक्षाचालक,बागकाम,सुतारकाम, वेल्डिंग, रंगकाम,मोबाईल दुरुस्ती,बिगारी |

प्रज्ञा विकास वर्गाचा २०२३-२४ यावर्षी चा  शालांत परीक्षाचा निकाल १००% लागला आहे.

**संक्षिप्त आढावा -**

1. प्रज्ञा विकास एकूण केंद्र – ०५
2. प्रज्ञा विकास कार्यक्रम एकूण लाभार्थी – २२०
3. प्रज्ञा विकास वर्ग एकूण तासिका – ९०

## २. निगडी

### सेवा शिबिर, गुरुकुल





सेवा शिबिर म्हणजे आपण निःस्वार्थ भावनेने इतरांची सेवा करण्यासाठी घेतलेले शिबिर! ८ वीच्या एकूण ३२ मुलांनी वस्तीभागातील १२० मुलांसाठी लेखन, वाचन, कला-कौशल्य, खेळ इ. कार्यशाळा घेतल्या. मुलांना सोबत घेऊन बागेची स्वच्छता करणे, शाळेची भिंत रंगवून देणे इ. सेवा गटाने केली. मुलांनी वस्तीतल्या मुलांची जीवनशैली समजून घेतली.

## ३. सोलापूर

### अंकुर प्रकल्प

**को भूमीचे मार्दव | सांगे कोंभाची लवलव** || या ओवीत श्रीज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे बीज अंकुरण्यासाठी भूमीमध्ये मार्दवता पाहिजे. त्याप्रमाणे शिक्षकांनी प्रेमाने, मार्दवतेने सोलापूरातील भटक्या विमुक्त मुलांसाठी शिक्षणाला अनुकूल अशी भूमी तयार करून त्यांच्यामध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी **'अंकुर प्रकल्प'** कार्यरत आहे. इ.१ली ते ४थीतील एकूण २५ विद्यार्थी प्रकल्पात सहभागी आहे.

#### अक्षरहंडी

गोविंदा आला रे....असे म्हणत गोपाळकाल्याच्या दिवशी मुलांनी दहीहंडी फोडली. या हंडीतून त्यांच्या अंगावर अक्षरांची कोडी पडली. मुलांकडून कृतिकामातून अक्षर कोडी बनवून घेतली होती. यातून मुलांची अक्षरओळख पक्की करण्याचा प्रयत्न सफल झाला.

#### पोलिसांना राखी

आपल्या प्रकल्पाची माहिती ऐकून पोलीस म्हणाले, **'ही मुले पुढे गुन्हेगार म्हणून स्थानकात येणार नाहीत याची तुम्ही काळजी घेत आहात याचा आनंद वाटला.'** मुलींनी ३० पोलीस बांधवांना राखी बांधली. पोलिसांनी आनंदाने मुलांना शैक्षणिक साहित्याची भेट दिली.

> ➢ **एक सुखद धक्का**
>
> "एके दिवशी मला वर्गास पोचण्यास उशीर होत होता. प्रकल्पात पोहोचेपर्यंत मुले काय गोंधळ घालत असतील या विचाराने मी काळजीत होतो. मात्र तेथे पोहोचल्यावर मुले ध्यान व प्रार्थना करत आहेत हे पाहून एक सुखद धक्का बसला."
>
> \- वर्गाचे शिक्षक

# ग्रामीण भाग

# वाड्या, वस्त्या, तांड्यांवरील उपक्रम व प्रदेश विकसन

**पुणे**

१. भोर
२. वेल्हे
३. मुळशी



# १. आंबेजोगाई

## नागरी वस्ती

### नव्या बांधवांची ओळख!!



कोविडच्या काळात बरीच उलथापालथ झाली. अनेक लोकांच्या आयुष्यात तो खूप बिकट काळ होता. लोकात रमणाऱ्या माझ्यासारख्या माणसाला घरात निवांत राहणे खूपच अवघड होते. परिस्थितीच अशी होती की घरात बसून राहणे भाग होते. काही दिवसातच लक्षात आले की अंबाजोगाईतील अनेक नागरीवस्त्यातील बांधवांचे हातावर पोट आहे त्यांना खऱ्या अर्थाने मदतीची गरज आहे. त्याच बरोबर काही वस्त्या ह्या भटक्या आणि विमुक्त बांधवांच्या आहेत. त्यांचे आयुष्य तर खूपच बिकट आहे. नव्यानेच ओळख झालेला हा समाज गट होता. वीस वर्षे अंबाजोगाई आणि मराठवाड्यात काम करत असताना या समाज गटा पासून मी कोसो दूर होतो.ह्या बांधवांचे राहणे. त्यांच्या चाली रीती,भाषा असे अशा अनेक गोष्टी समजून घेण्यास सुरुवात केली. आधी पंधरा दिवसांनी मग आठवडयानी आणि आता तर दररोज जाणे सुरू झाले. आता वस्तीवरील ज्येष्ठ स्त्री - पुरुषांशी, मग मुलांशी असे करत करत वस्तीवरील सर्वांशी आमचे नाते जुळू लागले. माझ्यासोबतचे कार्यकर्ते बदलत होते आणि ते अगदी साहजिक होते. मी मात्र ह्या बांधवांचे दर्शन घेण्यासाठी शक्य तो दररोज जात होतो. आता तीन वस्त्यांवर नियमित प्रत्येकी एक तास मी आणि शुभम जात आहोत.

### नवा कोरा अनुभव !!

विरल, अनुराग, सार्थक, स्वराज, अदिनाथ ही आठवीतील मुलं. त्यांच्या सोबत होता अकरावी मध्ये शिकणारा पृथ्वीराज. हे सगळे ज्ञान प्रबोधिनी, निगडीच्या गुरुकुलात शिकतात. तसे मध्यमवर्गीय पण सुखवस्तू कुटुंबातील मुलं. त्यांना मराठवाड्यातील भटक्या आणि विमुक्त बांधवांचा फारसा परिचय नाही. ज्ञान प्रबोधिनी मध्ये घेतल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या शिबिरातील सेवा शिबिरासाठी ते अंबाजोगाईत आलेले. बरेच काही ठरवून आले होते. त्यांच्या मनात शिबिराचे वेगळेच चित्र होते. प्रत्यक्षात जेव्हा ते धनगर वस्तीवर आले त्यावेळी वस्तीवरील सगळीच घरं दुसऱ्या जागी हलवली जात होती. कारण पण अदभूत होते.

काही दिवसाच्या पूर्वी एका वृद्ध महिलेचा अंत्यसंस्कार वस्तीवरील परिसरात करण्यात आला होता. त्या वृद्ध महिलेचा मृतात्मा सगळ्या धनगर बांधवांच्या म्हणे मागे लागला होता. प्रत्येकाच्या घरात उलट्या आणि जुलाब सुरू झाले होते. त्यामुळे सगळी वस्तीत दुसरीकडे विस्थापित होत होती.

दुसऱ्या जागेवर आम्ही जाताच मुलं गोळा व्हायला लागली. हा सर्व प्रकार निगडीच्या मुलांसाठी काही वेगळाच होता. आता खरं त्यांची क्षमता पणाला लागणार होती.मोकळ्या माळावर मुक्तपणे बागडणाऱ्या 40 मुलांचे तीन दिवसांचे शिबिर ते घेणार होते. मी फक्त त्यांना उपस्थित राहून आधार तो काही देणार होतो. पहिला दिवस थोडा अवघडच गेला. एकूण परिस्थिती समजली आणि मग दुसऱ्या दिवशीचे नियोजन करण्यात आले. दोन वेगळ्या विश्वात जगणारी मुलं एकमेकांची मित्र होत होती. दुसरा दिवस मात्र बरा गेला. बरेच काही मनासारखे झाले. मुलं

एकेमेकांची चांगलीच दोस्त झाली. तिसरा दिवस फारच झक्कास गेला. वस्तीवरील मुलांच्यासाठी खेळ,गीत,हस्तकला,स्पर्धा,गोष्टी असे अनेक कार्यक्रम होते. सगळ्याच मुलांचा कस लागत होता. तिसऱ्या दिवशी काही स्पर्धा आणि बक्षीस समारंभ होता. वस्तीवरील मुलांनी सुरेख व्यवस्था आम्ही जाण्या आधीच केली होती. मैदान साफ करून त्यावर प्रत्येक घरातील एक सतरंजी अंथरलेली होती. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली होती. सगळं काही सुरेख होते. खोखोचा सामना मस्त रंगला. हरलेल्या टिमला समजून सांगताना निगडीतील प्रबोधकांचा कस लागत होता.

वर वर पाहता हा दोन्ही मुलांच्यासाठी हा खूप साधा अनुभव होता पण दोघांच्या भावविश्वात एक अनोखे नाते मात्र पक्के होत होते. बोलके देशभक्त होण्या पेक्षा कर्ते देशभक्त होण्याचे हे शिक्षण होते !!

## नव्या युगाच्या नवा धर्म आणि नव्या प्रथा !!



ज्ञान प्रबोधिनीच्या निवेदिता गटाचे महिला सदस्य नेहमीच काही न काही उपक्रम घेत असतात.

अधिक मास हा पुरुषोत्तम मास म्हणून पण ओळखला जातो. अधिक महिन्याचे धोंडे जेवणाचे आमंत्रण अनेकांना दिले जाते. अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान समजले जाते. निवेदिता गटाच्या सर्व ताईंनी आपल्या वस्तीवरील बांधवाना अन्नधान्य देण्याचा संकल्प केला व तो १५ ऑगस्टच्या दिवशी पूर्ण केला. फक्त निवेदिता गटाचे सदस्य नाही तर काहींचे कुटुंबातील सदस्य पण यात सहभागी झाले.१३ कुटुंबांना शिधा देण्यात आला. निवेदिता गटाच्या तीन सदस्य प्रत्यक्ष वस्तीवर आल्या. त्यांनी वस्तीवरील सर्वांशी खूप गप्पा मारल्या. नवा भारत घडवण्यासाठी नव्या युगाचा नवा धर्म आणि नव्या प्रथा असल्या पाहिजेत !!

## आमचा शिक्षक दिन....

मुलांचे चित्र रंगवून झाले होते. त्यानंतर पाढ्यांचा आणि गणिताचा अभ्यास पण झाला होता. शेवटी "२० चा आकडा" हा सर्वांचा आवडता खेळ झाला. पावसाचे थेंब पडायला सुरू झाले होते. फार जोरात पाऊस पडेल असे वाटत नव्हते.

मी सर्व मुलांना विचारले, की आम्ही पावसात भिजत जाऊ की तुमच्या घरात बसूत.

मिजाज लगेच म्हणाला, "माझ्या घरी चला दादा." शुभम व माझ्या सह सगळीच मुलं मिजाजच्या घरात गेलो. पावसाचा जोर वाढला. मिजाजची आई पॉलिथीन आणि जुन्या साड्यांची बनवलेली झोपडी ठीक ठिकाणी नीट करत होती. पाऊस मध्ये येऊ नये म्हणून तिचे प्रयत्न सुरू होते.

सर्व मुलाना मी आणि शुभम त्यांच्या सोबत त्या झोपडीत बसलो हे फारच भारी वाटत होते. पाऊस थांबल्यावर आम्ही जायला निघालो.

मिजाज मला हळूच म्हणाला, "दादा आपण सगळ्यांचा एक फोटो काढू."

आज आमचा शिक्षक दिन मिजाजच्या झोपडीत छान साजरा झाला.

## ज्यांची बाग फुलून आली त्यांनी दोन फुले द्यावीत...

सत्यधर्माचे अनुयायी श्री बालाप्रसादजी आणि वहिनी दोघेही नियमित अग्निहोत्र करणारे. सत्यधर्माचा अनुभव घेण्यासाठी धर्मभिक्षा मागण्याचा संकल्प बियाणी कुटुंबांनी केला. भिक्षा मागताना मिळणारा नकार पचवण्यातून अहंकाराचे विसर्जन होते. मिळालेली भिक्षा गरजू लोकांना भेट म्हणून द्यायची. वाड्या वस्त्यांवरील भटक्या विमुक्त समाजातील बांधवांना अन्नधान्याचा शिदा देण्याचा संकल्प बालाप्रसादजीने केला.

कोविड महामारी पासून ज्ञान प्रबोधिनीचा चांगला संपर्क अंबाजोगाईतील विविध वस्त्यांवर आहे. वस्तीवरील बांधवांच्या सोबतच मुलांच्यासाठी आनंद शाळा दररोज चालते. गेल्या तीन वर्षात खूप चांगले बदल मुलांच्या मध्ये होताना दिसत आहेत. मुलं व मोठ्या बांधवांसाठी अनेक उपक्रम घेतले जातात.
अंबाजोगाईतील अनेक बांधव वस्तीला भेट देतात. वस्तीवरील लोक जीवनाचा अभ्यास केला जातो. वस्तीवरील लोक जीवन निरामय होण्यासाठी विविध बदल केले जातात.

बालाप्रसादजींनी धर्मदीक्षातून मिळणारी भिक्षा प्रबोधिनी ज्या वस्तीवर काम करते त्यातील फकीर,गिरी आणि धनगर वस्तीवरील १५ कुटुंबाला अन्नधान्याचा शिधा देण्याचे ठरवले. व्यवस्थित रचना करून आज मी, बालाप्रसादजी, वहिनी वस्तीवर निघालो.अतिशय मंगलमय वातावरणात धर्मदीक्षा आपल्या धर्माच्या बांधवांना देण्यात आली.

## एक हात मदतीचा....

शाळांच्या वार्षिक उत्सवात असणारा आनंद नगरी हा खरोखरच एक आनंदोत्सव असतो. वेगवेगळे खाण्याचे पदार्थ आपल्या पालकांच्या मदतीने करायचे आणि त्यांची विक्री आनंद नगरी करायची. यातून मुलं विक्री कौशल्य शिकतात. नफा मिळवायला शिकतात.

स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर ही शाळा अशी आनंद नगरी आयोजित करतेच पण त्याच बरोबर विद्यार्थ्यांवर व पालकांवर देण्याचा संस्कार व्हावा म्हणून नफ्यातील काही हिस्सा आपल्या नागरी वस्तीतील कामासाठी देतात. शाळा हे करून थांबत नाही तर आपला पण यात वाटा असावा म्हणून काही रक्कम शाळेतर्फे यात घालते. एक हात मदतीचा यानावाने यावर्षी ७१५२ रुपये वस्तीवरील कामासाठी देण्यात आले.

## सगळे काही विसरून ती बालपण जगत असते...



वस्त्यांवर मुलांच्या पेक्षा मुलींची संख्या जास्त. भ्रूणहत्या करणाऱ्यातील ते नाहीत. अश्विनी अशीच धनगर वस्तीवरील एक चुणचुणीत पोर. तेराच्या आसपास वय. तिचा जन्म झाला पंढरपूरला. वडील लक्ष्मण पोटापाण्यासाठी भटकत अंबाजोगाईला आले. गेली चार वर्षे ते अंबाजोगाई आहेत. अभ्यासात, चित्रकलेत आपली चांगलीच चुणूक दाखवणारी अश्विनी नेहमीच हसतमुख आणि मधाळ वाणीची का आहे हे समजून घेण्याचा मी प्रयत्न करत होतो. अश्विनी सकाळी सात वाजता उठते. आवरून झाले की घर कामासाठी आईला मदत करते. ती संपूर्ण स्वयंपाक करते आणि त्यात ती तरबेज पण झाली आहे. आई वडील टोपले विकायला गावात गेले की लहान भावानां सांभाळने हे तिचे काम. ते करतच धुणेभांडी करणे. सरपण विकत आणणे. मोठ्या घागरीने दहा

घागरी दररोज पाणी भरणे. पाणी भरणे झाले की ती आणि इतर मुली गवताला जातात. घरातील शेळ्यांना ते लागते. गवत उपटून जमा करताना हाताला चांगल्याच जखमा होतात. चार पाच किलोमीटर हिरवे गवत मिळवण्यासाठी त्यांना जावे लागते.

गवताहून परतल्यावर हातपाय धुवून अश्विनी आपल्या हसऱ्या चेहऱ्याने ज्ञान प्रबोधिनीच्या आनंद शाळेला येते. तिच्यासाठी दिवसातील तो सगळ्यात जास्त करमणारा काळ असतो. दिवसातील सगळे काही विसरून ती बालपण जगत असते.

## मनसोक्त जगण्याचे दिवस !!

सगळ्या शाळांना सुट्टी लागली. शहरातील मुलं विविध छंद वर्गांना, शिबिरात जात आहेत. एकूणच सुट्टी मनोरंजक व ज्ञानवर्धक जावी असे सुशिक्षित पालक जाणतेपणाने ठरवत आहेत. आपल्या समाजातील असा एक वर्ग आहे जो या सर्वांच्या पासून कोसोदूर आहे. अशा भटक्या आणि विमुक्त बांधवांच्या मुलांच्यासाठी आपली ज्ञान प्रबोधिनीची आनंद शाळा चालते. सुट्टीत काय करावे हे त्यांना विचारून ठरवले. त्यांना दररोज फिरायला जायचे होते ते ही माझ्या कार मध्ये. मस्त मोठया आवाजात त्यांना छान छान गीते फिरायला जाताना ऐकायची आहेत. भरपूर एकत्र दंगा त्यांना करायचा आहे. खड्या चालीतील देशभक्तीपर गीते त्यांना म्हणायची आहेत. दररोज वेगळा खाऊ त्यांना खायचा आहे. चित्र रंगवणे चालूच असते. माझ्याशी त्यांना भरपूर गप्पा मारायच्या आहेत.

आज असे मनसोक्त जगण्याचे दोन दिवस पूर्ण झाले. धनगर वस्तीवरील ९ मुलं. गिरी वस्तीवरील ७ मुलं. शिकलकरी वस्तीवरील २० मुलं यात सहभागी होत आहेत. प्रत्येक वस्तीवर पूर्ण एक तास हे सगळे चालते. माझ्यासाठी साडे तीन तास परिपूर्ण जगण्याचे असतात.

## आमच्या आयुष्यातील हा पहिलाच पाळणा..



ज्ञान प्रबोधिनीने अंबाजोगाईत नागरी वस्तीचे आणि भटक्या विमुक्त बांधवातील काम सुरू करताना एक निश्चित केले होते की नियमितपणे वस्त्यांना भेटी द्यायच्या. वस्तीचे दर्शन घ्यायचे. जे काही आकलन होईल ते लिहून प्रबोधिनीच्या हितचिंतकांना पाठवत राहायचे. अशा सर्व हितचिंतकांना प्रबोधक परिवार असे म्हटले जाते. प्रबोधक परिवाराचे सदस्य आपल्या तन,मन,धनाने प्रबोधिनीच्या कामाला मदत करतात त्यामुळे गेले 1000 दिवस हे काम न थांबता चालू आहे.

प्रबोधक परिवारात ज्ञान प्रबोधिनीचे जुने विद्यार्थी पण आहेत. त्यातील एका ताईने सहजच मला विचारले की सगळ्या वस्तीवर गरोदर माता किती आहेत. मी संख्या सांगितल्यावर. तिचा दुसरा प्रश्न होता एक वर्षांच्या आतील लहान मुलं किती आहे? मी सर्वांना विचारून आकडा सांगितला. माझ्या कडून माहिती मिळाल्यावर तिने आपल्या मैत्रिणींना परिस्थिती सांगितली. पण काही निश्चित असे हाताशी आले नाही.

शेवटी आम्ही वस्तीवरील सर्व आयांना विचारायचे ठरवले की लहान मुलांना आणि आयांना काही समस्या आहेत का किंवा त्यांना काही मदतीची गरज आहे का ? दोन दिवस विचार करून वस्तीवरील बहिणींना सांगायला सांगितले.

वस्तीवर मोठ्या प्रमाणावर डास आहेत. डास चावल्याने अनेक रोग तर होतातच पण त्याबरोबर अंगावर डास चावल्याने लाल पुरळ पण येते. डासां पासून रक्षण म्हणून एक पाळणा मिळतो. त्यातून दोन उद्देश साध्य होतात.

ज्ञान प्रबोधिनीची विद्यार्थिनी वस्तीवरील समस्या समजून घेऊन सगळ्या लहान लेकरांना पाळणा घेऊन दिले. एका प्रश्नावर असे उत्तर शोधण्या पर्यँतचा प्रवास झाला.हे सगळे करताना माझ्या नावाचा कुठेच उल्लेख नको हे सांगायला ती विसरली नाही. आमच्या आयुष्यातील हा पहिलाच पाळणा हे सांगायला वस्तीवरील पालक विसरले नाहीत.

# हराळी ता. लोहरा, तोरंबा जि. धाराशिव

## ऊसतोडी कामगारांच्या तांड्यांवरील 'आनंदशाळा'

### आनंदशाळा :-

ऊसतोडी कामगारांच्या 'तांड्यांवरील' मुलांना शिक्षणाची गोडी लावण्याच्या उद्देशाने कोरोना काळात सुरू झालेल्या आनंद शाळा आज १५ ठिकाणी चालतात.

### शिक्षण पद्धती :-

**'गोरमाटी'** ही बोली भाषा बोलणाऱ्या मुलांसाठी मराठी ही इंग्रजी भाषेइतकीच शिकायला कठीण जाणार याचं भान ठेवून आनंदशाळेच्या अभ्यासक्रमाचं नियोजन केलं जातं. कृतियुक्त अनुभव शिक्षणात त्यांच्या बोली भाषेचा वापर केल्याने व अवघड संकल्पना चित्रफितींच्या माध्यमातून सोप्या करून शिकवल्या जात असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये लक्षणीय प्रगती दिसून येत आहे.

### विशेष उपक्रम :-

**१. स्वातंत्र्यदिन:-**

स्वातंत्र्यदिनाच्या आठवड्यात चित्रकला, क्रीडा स्पर्धा, सामुहिक ठिकाणी बसून वैयक्तिक वाचन करणे तसेच वृक्षारोपण असे उपक्रम झाले. इंदिरानगर तांडा इथे प्रबोधिनीच्या युवक विभागाने बरची नृत्याची प्रात्याक्षिके जोशपूर्ण पद्धतीने सादर केली.

**२. गणेशोत्सव व निवासी शिबीर:-**

गणेशोत्सवात 'दप्तराविना शाळा' या उपक्रमात आठवडाभर पाठांतर, विषय देऊन नाटक सादर करणे, मातीकाम, गोष्ट, इंग्लिश-विंग्लिश डे, गणित यज्ञ, शब्दांची भेळ, प्रकट वाचन अशी विविध सत्रे झाली. आनंदशाळेतील निवडक ३२ मुलांचं प्रबोधिनीच्या केंद्रात निवासी शिबिर झालं.

**३. संत सेवालाल महाराज जयंती सप्ताह:-**

या सप्ताहात संत सेवालाल महाराजांचे बोल ऐकवत प्रभात फेरी झाली, तांड्यांवरील महिलांसाठी विशेष स्पर्धा, मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, पारंपारिक वेषातील नृत्ये, तसेच सेवालाल महाराजांचे चरित्र वाचन करण्यात आले.

**आनंदघर:-**

पालक आणि विद्यार्थ्यांचा भरपूर प्रतिसाद असलेल्या ताड्यांमध्ये मुलांना अभ्यास आणि इतर कला गुण जोपासण्यासाठी हक्काची जागा असावी या हेतूने ह्यावर्षी ४ तांड्यावर **'आनंदघराची'** स्थापना करण्यात आली.

# भोर, वेल्हे जि. पुणे

## कातकरी विकास प्रकल्प

या प्रकल्पात शिक्षण, आरोग्य, रोजगार, आर्थिक साक्षरता, शासकीय योजना, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा असे एकूण ७ विषयांवर काम चालते. या वस्त्यांवर एकूण १९ मार्गदर्शिका/प्रशिक्षिका कार्यरत आहेत. या वर्षी ६ वस्त्यांवर नियमित व ९ वस्त्यांवर प्रासंगिक काम केले.

### १. शिक्षण:-

कातकरी समाजातील मुलांनी शिक्षणाच्या प्रवाहात यावे, चांगल्या सवयी लागाव्यात, कौशल्य विकसित व्हावीत म्हणून वेल्हे तालुक्यातील ६ वस्त्यांवर मुलांसाठी वेगवेगळ्या सत्रांचे नियोजन करण्यात येते. आठवड्यातून २ याप्रमाणे महिन्याला ८ सत्रे घेतली जातात.

**वस्त्यांवरील सत्रे:**

- वर्षभरातील एकूण सत्रे : २९४
- सहभागी विद्यार्थ्यांचा वयोगट : वय वर्ष ५ ते १५
- एकूण मुले-मुली : १३०



- सत्रांमध्ये घेतले जाणारे विषय :

१. **चांगल्या सवयी:**

मुलांना चांगल्या सवयी लागाव्यात म्हणून शारीरिक स्वच्छता व परिसर स्वच्छतेची सत्रे घेतली जातात. या विषयाची माहिती सांगून, छोट्या छोट्या व्हिडीओ दाखवून, तसेच काही गोष्टींचे प्रात्यक्षिक दाखवून करून घेतले जाते.

२. **कला-कौशल्य:**

मुलांच्या कला कौशल्यांना वाव मिळावा म्हणून कौशल्य सत्राचे नियोजन केले जाते. उदा. कागदी फुले बनवणे, किल्ला बनवणे, पणत्या रंगवणे, कथा कथन स्पर्धा इ.

३. **अभ्यास:**

'आनंदी शिक्षण' या उपक्रमातून मुलांना भाषा व गणित हे विषय शिकवले जातात. या विषयांवर व्हिडीओ दाखवून व माहिती सांगून चर्चा घेतली जाते. वेगवेगळ्या खेळांच्या माध्यमातून मुलांपर्यंत विषय पोहचवला जातो. या निमित्ताने मुलांना अभ्यासाची सवय लागण्यास मदत होत आहे.



## २. मेळावे:-

**गंमत खेळ मेळावा**:

करंजावणे येथे वस्त्यांवरील मुलांचा गंमत खेळ मेळावा झाला. या मेळाव्यात ५३ मुले-मुली व ११ ताई असे एकुण ६४ जण सहभागी झाले. गट केल्यामुळे प्रत्येक मुलाला प्रत्येक खेळ खेळण्याचा आनंद घेता आला. एकुण ८ खेळ घेण्यात आले. नियमित गोट्या आणि पत्ते खेळणाऱ्या मुलांना या निमित्ताने नवनवीन खेळ खेळता आले. जे कधीच खेळले नव्हते.

**आषाढी एकादशी मेळावा**:

आषाढी एकादशी निमित्त मालवली ते तामकरवाडी वारीची योजना केली होती. या वारीत ६ कातकरी वस्त्यांवरील ८१ मुले-मुली, ज्ञान प्रबोधिनीच्या वेल्हे निवासातील ११ मुली व ९ ताई असे एकुण १०१ जण सहभागी झाले.



**विज्ञान मेळावा**:



६ वस्त्यांवर विज्ञान मेळावे घेण्यात आले. या मेळाव्यात एकूण १०३ विद्यार्थी सहभागी झाले होते. हा मेळावा घेण्यासाठी नेतृत्व संवर्धन केंद्रातील १८ विद्यार्थी व प्रकल्पात काम करणाऱ्या १३ ताई अशा ३१ जणांनी मिळून वस्त्यांवर मेळावे घेतले. या मेळाव्यात वेगवेगळे खेळ, गाणी, गोष्टी व विज्ञान प्रयोग शिकवण्यात आले. असा प्रत्येक वस्तीवर ३ तासांचा मेळावा घेण्यात आला.

## ३. प्रशिक्षण:-

या वर्गात व्हिडीओ दाखवून मुलांना समजावून कसे सांगायचे हे सांगण्यात आले. तसेच खेळातून अभ्यास कसा घ्यावा, रचना पेटीचा उपयोग कसा करावा व त्यामधून भाषा आणि गणित याविषयाचे खेळ कसे तयार करावे हे प्रशिक्षणातून शिकवले. १९ तायांचे एकूण ५ प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.

**१. सकस आहार उपक्रम :**
कातकरी वस्ती, चेलाडी येथील २ ते १३ वर्षे वयोगटातील ८३ मुला-मुलींकरीता हा उपक्रम घेण्यात आला. रोज १०८ दिवस सकस आहार देण्यात आला.



- **प्रकल्प परिणाम :**

१. वस्त्यांवरील लोकांची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने मिळेल तिथे दिवसभर काम करून दिवस भागवला जातो. या प्रकल्पाच्या निमित्ताने मुलांना एक वेळचा पोटभर खाऊ मिळाला.

२. या वस्तीवरील पालक मुलांच्या शारिरीक वाढीकडे लक्ष देत नाहीत. आपण दिलेल्या आहारामुळे किमान फरक लक्षात आला.

३. दररोज आहार देण्याआधी मुलांनी अंक उजळणी म्हणावी असा आग्रह धरल्यामुळे मुलांचे १ ते ७० पर्यंतचे अंक पाठ झाले.

**मुलांची शारीरिक वाढ**

| **निकष** | वजन | उंची | दंडघेर | डोक्याचा घेर |
|---|---|---|---|---|
| **टक्केवारी %** | ३९% | ३८% | ३९% | ३६% |

**२. स्वच्छता उपक्रम :**
मालवली, कोंढवली, अडवली, अंबवणे या ४ वस्त्यांवर लोकांच्या सहभागाने स्वच्छतेचे उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमामध्ये मुलांचा सहभाग चांगला होता. खालील ३ उपक्रम वरील चारही वस्त्यांवर घेण्यात आले.

१) परिसर स्वच्छता
२) कचरा व्यवस्थापन
३) सांडपाणी व्यवस्था

वस्तीवर जाणाऱ्या तायांनी गटाने हे काम केले. परिसर स्वच्छतेचे महत्व सांगत वस्ती स्वच्छता करून घेतली. वस्तीवरील सर्व कचरा एकत्र गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्याबद्दल लोकांशी बोलणे झाले. तसेच वस्तीतील सांडपाणी व्यवस्थापनाचे काम करून घेतले. या उपक्रमांमुळे वस्त्यांवर स्वच्छतेत फरक जाणवतो आहे.

## ४. रोजगार:-

- **मार्गदर्शन सत्रे :** २ वस्त्यांवर बांबू प्रशिक्षण वर्ग घेण्यासंदर्भात २ मार्गदर्शन सत्रे झाली. या सत्रात एकूण १९ लोक सहभागी झाले.



**बांबू प्रशिक्षण:** २ वस्त्यांवर बांबू प्रशिक्षण वर्ग झाला. एकूण १८ जण या बांबू प्रशिक्षण वर्गाला सहभागी झाले होते. ८ जणांनी हा वर्ग पूर्ण केला. बांबू प्रशिक्षण वर्ग पूर्ण केलेल्यांना मासे ठेवण्याचे storage box बक्षीस म्हणून देण्यात आले.

**आकाश कंदील प्रशिक्षण:** या प्रशिक्षण वर्गात २ प्रकारचे आकाशकंदील, वेणी प्रकार, स्टार, ट्रे, वॉलपीस, फुलदाणी बनवायला शिकवल्या.



## ५. शासकीय योजना व कागदपत्रे :

१३ वस्त्यांवरील एकूण ३१६ लोकांचा कागदपत्रांचा सर्व्हे करण्यात आला. तसेच १० लाभार्थ्यांना कागदपत्रे काढून देण्यात देण्यात आली.



**सत्कार:** प्रतिक्षा वाघमारे ही इयत्ता पाचवीपासून ज्ञान प्रबोधिनी: जास्वंद गिरीकन्या निवास वेल्हे येथे राहून शिक्षण घेत आहे. तिच्या प्रेरणेने अजून दोघींनी निवासात शिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे. प्रतिक्षा वाघमारे व तिच्या आई वडीलांचा सत्कार करण्यात आला.

## ६. आर्थिक साक्षरता:

- मालवली वस्तीवर मासिक १०० रुपये बचत करणारे २ गट सुरु आहेत. या गटांमध्ये एकूण २७ महिला आहेत.

**बैठका:** दरमहा १ याप्रमाणे या वर्षी एकूण १५ बैठका घेण्यात आल्या. मुलांमधील विशेष बदल, अभ्यासातील प्रगती, वस्तीवरील प्रश्न/अडचणी अशा वेगवेगळ्या विषयांवर चर्चा घेतली जाते.

# जि. रायगड, सुधागड

## कातकरी वाडीत आनंदी शिक्षण

पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांची किमान शैक्षणिक गुणवत्ता विकास व्हावा तसेच पाचवीच्या पुढील विद्यार्थ्यांना कौशल्य विकास कार्यक्रम घेणें, स्थानिक ल कातकरी यांच्यात एकोपा निर्माण करणे व कातकरी विद्यार्थीना पदवी पर्यंतचे शिक्षण देण्यास मदत करणे यासाठी म्हणून आनंदी शिक्षण प्रकल्प सुरू करण्यात आला. २०२३-२४ पासून आनंदी शिक्षण कार्यक्रमाच्या निमित्ताने कातकरी वाड्यांमध्ये पसरता आले. सुधागडाच्या आजूबाजूच्या सात कातकरी वाड्यांमध्ये प्रकल्प सुरु झाला. एकूण १७० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले.



### शिक्षक निवड –

विद्यार्थ्यांना त्यांच्याच भाषेत शिकता यावे म्हणून वाडीतीलच १२वी पास युवक-युवतीची शिक्षक म्हणून निवड केली. आपलाच दादा, ताई आपल्याला शिकवत आहे याचा विद्यार्थ्यांना आनंद होता.

### शिक्षक प्रशिक्षण –

प्रशिक्षणात विविध चित्रफित/दृक्श्राव्यातून विषय शिकवणे, शिक्षण साहित्याचा वापर, विद्यार्थी सहभाग, विद्यार्थी क्षमतेनुसार प्रगती मोजणे, तसेच दल घेण्याबाबत चे शिक्षक प्रशिक्षण झाले. कातकरी प्रकल्पातून ७ शिक्षक व १ समन्वयक सहभागी झाले. एकूण २-२ दिवसांची ४ शिक्षक प्रशिक्षणे पुणे ज्ञान प्रबोधिनी व सिद्धेश्वर येथे घेण्यात आले.

### अभ्यासक्रम –

प्रत्येक पाठाला अनुसरून भाषा, गणित, परिसर विषयांसाठी व्हिडिओ (एक पाठास ३-४) गणित आणि भाषेसाठी शिक्षक हस्तपुस्तिका तयार करण्यात आली. गाणी, गोष्टींच्या माध्यमातून पाठ शिकवण्यासाठी ऑडीओ मालिका तयार करण्यात आली.



## मूल्यमापन –

व्हिडीओ व पाठावर आधारित प्रत्येक विद्यार्थ्याची साप्ताहिक चाचणी व प्रत्येक महिन्याच्या शेवटी मासिक चाचणी घेण्यात आली. प्रत्येक इयत्तेसाठी वेगवेगळ्या रंगांमध्ये रंगीत सराव पत्रांमुळे विद्यार्थी आनंदाने सोडवत.

## बालजत्रा –



मध्य चाचणी म्हणून सिद्धेश्वर येथे बालजत्रेचे नियोजन करण्यात आले. सर्व शालेय क्षमता असणारे इयत्ता पहिली ते पाचवी चे भाषा, गणितासाठी आठ प्रश्न विद्यार्थ्यांना खेळाच्या माध्यमातून सोडवण्यास सांगितले. काही विद्यार्थीनी त्यांच्या इयत्तेपेक्षा वरील इयत्तेचेहि प्रश्न सोडवले. तर काही विद्यार्थीनी मागच्या वर्गांतले प्रश्न सोडवले. आनंदी शिक्षण उपक्रमातील १५९ तर अन्य शाळेतील ४५ विद्यार्थीनी बालजत्रेतून परिक्षा दिली. बालजत्रेला पालक वर्ग, ग्रामपंचायत सदस्य व दोन सरपंचांनी भेट दिली. मूल्यमापन करण्यासाठी उपक्रमातील शिक्षक, स्थानिक स्वयंसेवी कार्यकर्ते व सुधागड एज्युकेशन सोसायटी वावळोली शाळेतील ९ वी च्या २० विद्यार्थीनी अश्या ४० कार्यकर्त्यांचे बलजत्रा घेण्यापूर्वी २ दिवसाचे प्रशिक्षण घेतले गेले.

## उपक्रमातील कार्यक्रम –

स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनानिमित्ताने विविध स्पर्धा घेण्यात आल्या. बक्षिस म्हणून मुला मुलींना शालेय उपयोगी साहित्य देण्यात आले. दिवाळी निमित्तांने फराळ, सुवासिक साबण, उटणे, मुलांना नविन कपडे तर महिलांना साड्या वाटण्यात आल्या. संक्रांतीला कातकरी विद्यार्थ्यांनी ५०० घरात तिळगूळ वाटण्याचा कार्यक्रम केला. दोन केंद्रावर बिरसा मुंडा/आंबडेकर जयंती साजरी करण्यात आली.



## विशेष:-

शिक्षक व कातकरी शिक्षक, स्थानिक युवक-युवती यांच्या मध्ये पुढे जाण्याची उमेद तयार झाली आहे. काहींना MSW करण्याची इच्छा व्यक्त केली. एकाने प्रवेश ही निश्चित केला. नर्स होणे, कातकरी समाजाला पुढे घेऊन जाण्यासाठी धडपड करण्याची अनेकांनी इच्छा व्यक्त केली आहे. चाळीस ते पंचेचाळीस युवक-युवतीचा गट तयार झाला आहे. कातकरी प्रकल्पात हा गट नेहेमी सक्रिय असतो.

## पडसरे, विकास मित्र प्रकल्प

पडसरे या गावात ज्ञान प्रबोधिनीच्या माध्यमातून १०० दिवसांची शाळा चालविण्याचा नाविन्यपूर्ण प्रकल्प काही वर्षे चालविला गेला. कोरोनाच्या आधीच्या वर्षात 'प्रज्ञा विकास कार्यक्रम' आणि 'छोटे सायंटीस्टस' हे प्रकल्प पडसरे यथे सुरु असलेल्या अनुदानित आश्रमशाळेमध्ये झाले होते. यावर्षी पडसरे येथील इ. ५वी ते ९वीच्या विद्यार्थी गटासाठी 'विकसमित्र' प्रकल्प च्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमाची सुरूवात झाली. या प्रकल्पात एकूण ३०० विद्यार्थी सहभागी झाले. त्यासाठी दरमहा दोन दिवसीय शिबीर घेण्याची रचना करण्यात आली होती, अशी एकूण आठ शिबिरे पडसरे येथे घेण्यात आली.



विकास मित्र प्रकल्पाअंतर्गत अभ्यास कौशल्ये (वाचन, लेखन) कला अभिव्यक्ती, व्यक्तिमत्व विकास, विज्ञान शिकल्याची कौशल्ये तसेच विज्ञान संकल्पना, स्व-जाणिव, राष्ट्रीय एकात्मता, स्पर्धा, खेळ, इ. माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गटासोबत काम झाले. शैक्षणिक उपक्रम संशोधीकेतून २२ सदस्य यानिमित्ताने पडसरे च्या विद्यार्थ्यांची सत्र घेण्यासाठी आले होते. तसेच ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील नुकतेच १० झालेले ४ युवक व एक युवक विभागातील दादा असे एका शिबीरात मार्गदर्शक म्हणून आले होते. त्यांनी शिबिरात विविध विज्ञान प्रयोग, कोडी, गटकार्य, पद्य-अभंग घेतले. सायंकाळी दलावर मुलांना सांघिक खेळ शिकवले.

**ॐ तत्सत् श्रीनारायण तू पुरुषोत्तम गुरु तू**
**सिद्ध बुद्ध तू स्कंदविनायक सविता पावक तू ।**
**आर्तरूप तू रुग्णरूप तू जनी जनार्दन तू ।**
**अज्ञरूप तू दीनरूप तू राष्ट्ररूप ही तू ।।**

# प्रदेश विकसन

## पाणी टंचाई निवारण प्रकल्प

ग्रामविकसन विभागात पाणी टंचाई निवारण या प्रकल्पाअंतर्गत गेली दहा वर्षे पिण्याचे पाणी या विषयावर काम केले जाते. हे काम करताना धनगर, महादेव कोळी, कातकरी आणि मराठा अशा विविध समाज घटकांसाठी काम केलेले आहे व करत आहोत. धनगर व महादेव कोळी समाज हा मुख्य गावापासून डोंगरावर रहात असल्याने शासकीय योजना या समाजापर्यंत कधीही पोहचत नाही. शासनाच्या लोकसंख्येच्या निकषात या वाडीवस्ती बसत नसल्याने या ठिकाणी काम होत नाही.

**विहीर बांधकाम -** मुळशी तालुक्यातील पोमगाव - कात्रटवस्ती आणि माळेगाव - धनगरवस्ती या धनगरवस्तीवरं दोन विहिरींचे काम पूर्ण करण्यात आले.

**नळपाणी योजना-** भोर तालुक्यातील नीरा दोवधर धरणाच्या काठावरील प-हर गावातील कचेरवस्ती या धनगरवस्तीवर पाईपलाईनचे काम करण्यात आले.

**फेरोसिमेंट तंत्रज्ञान -** पाण्याच्या टाकी बांधकामात यावर्षी फेरोसिमेंट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. शहरी भागात जुन्या इमारतींचे आयुष्य वाढविणे, पाण्याची गळती थांबविणे, पाणी साठवण टाक्या बांधणे यासाठी मोठ्या प्रमाणात फेरोसिमेंट तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. सिमेंट व वाळू यासारखे बांधकाम साहित्य फेरोसिमेंट बांधकामासाठी तुलनेने कमी लागते. त्यामुळे बांधकाम साहित्यात २० टक्के बचत होते.

### वर्ष २०२३ मध्ये केलेले पाण्याच्या टाकीचे बांधकाम

| No. | जिल्हा | तालुका | गाव | लाभार्थी | टाकी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | वेल्हे | साईव | धनगर वर्ग | २७ |
| | | | केळद | | |
| | | | बालवड | | |
| २. | सोलापूर | माळशिरस | भांब | धनगर वर्ग | ०५ |
| | | मंगळवेढा | - | विवेकानंद शिक्षण संस्था | ०३ |
| ३. | सांगली | जत | हळ्ळी | भारत शिक्षण संस्था | ०१ |
| | | | उटगी | श्री गिरीराज आश्रम शाळा | ०१ |
| ४. | सातारा | महाबळेश्वर | शिरणार | - | ०२ |
| | | | उचाट | धनगर | ०२ |
| ५. | नाशिक | त्र्यंबकेश्वर | तोरंगण | वारली, महादेव कोळी | ०३ |
| | | | हिरडी | महादेव कोळी, कोकणा | ०२ |
| | | पेठ | तोंडवळ | वारली | ०१ |
| ६. | ठाणे | मुरबाड | भोरांडे | कुणबी व ठाकर | ०२ |
| **एकूण** | **०६** | **०८** | **१२** | | **४९** |

या कामामधून गावात जाणारा पाण्याचा टँकर बंद झालेला आहे. विभागाने खोदलेल्या विहिरींना केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन या योजनेची जोड मिळाल्याने शिळिंब, खोपडेवाडी, जयतपाड गोरेवस्ती या सारख्या गावांमध्ये दारात पाणी आलेले आहे.

# या माझ्या भारतदेशी

एकजीव उमदे व्हावे जनजीवन गावोगावी
या माझ्या भारतदेशी सुखस्वप्ने फुलुनी यावी ।। ध्रु. ।।

शेतात कोरड्या किसान गाळी
घाम पेरले उगवता हरखुन जाई भान
भरगच्च पिकाने पिवळे होई रान
बळिराजाची परि बाजारी धुळदाण
या भारतभूपुत्राच्या कष्टाला किंमत यावी ।। १ ।।

ही सागरवेष्टित भूमी सुजला सुफला
रखरखीत झाली ओलावा ओसरला
बोडके नागडे होता डोंगरमाथे
आटले झरे अन् सुकलेले पाणोठे
या सुकलेल्या रानात रुजवू या जीवनराई ।। २ ।।

गावात भांडती भाऊबंद शेजारी
हे लोक निरक्षर कर्जाने आजारी
भाबडे भोळसट व्यसनांनी बेभान
मागास रिकामे शहरांचेच गुलाम
या गावकऱ्यांच्या गावी नवनवी उभारी यावी ।। ३।

कान्ह्याच्या गावी भरले गोकुळ होते
गोपांच्या मेळी गोवर्धनबळ होते
कालिया पूतना कंस संपले सारे
यमुनेच्या काठी स्वातंत्र्याचे वारे
हरिकथा अवतरो हीच माझिया गावी ।। ४ ।।